# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती जाहिरात

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, धुळे

खालील कंत्राटी रिक्त पदे भरावयाची आहेत

| Sr. No | Name of Post | No of Post | Educational Qualification | Palce of posting | Monthly Honorarium |
|---|---|---|---|---|---|
| १ | Peer Supporter | १ | 12 th pass (With hepatitis B or C patient or Patient Relative (as per state guideline)) | DH Dhule | 8000/-(on Incentive Basis) |

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे हि कंत्राटी अंत्यत स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने २९ दिवस कालाधीची राहील. व शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा हेपेटाईटीस बी किंवा सी चा रुग्ण असावा किंवा हेपेटाईटीस रुग्णाचा नातेवाईक असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा कामावर आधारीत मोबदला रु.८,००० च्या मर्यादित देण्यात येईल.

५) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

६) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्ग ४३ वर्ष राहील.

७) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

८) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालीही दावा करता येणार नाही.

९) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय आवार, साक्री रोड धुळे येथे दि.०५/१२/२०२३ ते दि.१८/१२/२०२३ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत शासकीय सुटीचे दिवस वगळुन व्यक्तीशः सादर करावेत.

१०) मुलाखतीकरता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही. तसेच एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- टपाल तिकीट लावुन अर्जासोबत जोडावा.

११) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १५०/- चा डिमांड ड्राप्ट “District Integrated Health & Family Welfare Society, Dhule” या नावे देय असावा.

१२) सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज दि.१८/१२/२०२३ अखेर राहणार असुन तदनंतर छाननी, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी arogya.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यांसाठी येऊ नये

खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

१) क्षैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला ३) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ४) हेपेटाईटीस बी किंवा सी रुग्ण किंवा रुग्णाचे नातेवाईक असलेले प्रमाणपत्र ५) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ६) निवड झाल्यानंतर पोलिस वर्तुणुक दाखला.

| | |
|---|---|
| XXX | XXX |
| सदस्य सचिव तथा | अध्यक्ष निवड समिती तथा |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| जिल्हा परिषद,धुळे | जिल्हा परिषद,धुळे |